**नियमित फौजदारी खटला क्र. १९०/२०२३**
**निशाणी क्र. २३**

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार **क्र. १** यांची शपथेवर जबानी</u> .....

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की-

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | संपत रामचंद्र दुबल, |
| वय | - | ६५ वर्षे, |
| धंदा | - | निवृत्त शिक्षक, |
| राहणार | - | इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |

**<u>सरतपास सरकार तर्फे शासकीय अभियोक्ता श्री. एस. आर. मिरजे यांचेकडून सुरुः</u>**-

माझी मुलगी सन २०१८-१९ साली कराड येथे कॉलेजला होती. माझ्या मुलीची व आरोपीची फेसबुकवर मैत्री झाली होती. त्यानंतर तो तीला तुझ्याशीच लग्न करणार असे म्हणला. माझ्या मुलीने त्यास नकार दिला. त्यानंतर त्याने माझ्या मुलीला प्रेमाचे मॅसेज पाठविण्यास सुरुवात केली. तसेच तुझ्याशीच लग्न करणार असे देखील मॅसेज पाठविले. त्यानंतर मी, माझ्या मुलीचा मामा व माझी पत्नी असे मुलाच्या घरी समजावून सांगण्यास गेलो. त्यावेळी आरोपी पुढे त्रास देणार नाही असे म्हणाला. त्यानंतर तो इचलकरंजी मध्ये आला व माझ्या मुलीला फोन व मॅसेज केला. तसेच माझ्या मुलीला म्हणाली की, तुझे इतर ठिकाणी लग्न होऊ देणार नाही. माझी पत्नी आरोपी यास समजावून सांगणेकरीता आरोपीस इचलकरंजी येथे भेटण्यास गेली होती. त्यावेळी तो शांत राहीला. त्यानंतर देखील त्याने मॅसेज करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आम्ही आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली. आरोपी यास मी ओळखू शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील यांचे अर्ज निशाणी क्र.२२ वरील आदेशान्वये पुढील तारखेपर्यंत तहकुब</u> -**

श्रवणोत्तर स्विकृत

**(ए.एम.गायकवाड)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग क्र.३, इचलकरंजी**

**दिनांक - २०/०२/२०२६.**

**नियमित फौजदारी खटला क्र. १९०/२०२३**
**निशाणी क्र. २३**

**<u>आरोपीचे विधिज्ञ श्री. के. व्ही. पाटील यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरू-</u>**

०२. मी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, माणगाव येथे नोकरीस होतो. मी सन २०१९ मध्ये निवृत्त झालो. माझे मेव्हाणे सागर तवर हे कराडमध्ये राहतात. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा कराड येथे सन २०१९ मध्ये शिक्षण घेत होता. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१८-१९ मध्ये माझी मुलगी व प्रितम यांची कराडमध्ये ओळख झाली तसेच ते एकमेकांकडे जा ये करत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या दोघांचे एकमेकांवर प्रेम होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी पत्नी व माझे मेव्हणे हे प्रितमच्या घरी जाऊन आलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या कुटुंबियांचे त्यांच्या घरी सततचे जाणे येणे होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रितम व माझी मुलगी यांच्यामध्ये फेसबुकवर काय बोलणे होते याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फेसबुकवरील चॅटींग न पाहता मी पोलिसांना जबाब दिला.

प्रश्न - सन २०१८ ते २०२३ मध्ये त्यांच्यामध्ये काय चॅटींग होते हे न पाहता मी जबाब दिला ?

उत्तर - त्यांच्यामध्ये चॅटींग होत नव्हते.

०३. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलगी व प्रितम यांच्यामध्ये चॅटींग होत असताना देखील मी माहिती न घेता जबाब दिला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या मुलीच्या फोनवरती लग्नासंदर्भात कोणताही मॅसेज पाठविलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या जबाबात सांगितलेले मजकूर की, प्रितम याने लग्नाकरीता मॅसेज पाठविला व लग्न होऊ न देण्यीच धमकी दिली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी पत्नी आरोपी यास समजावून सांगण्याकरीता गेली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात आरोपीविरूध्द केलेले आरोप खोटे आहेत.

०४. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०७/०३/२०२३ रोजी पोलिसांनी लिहून

घेतलेल्या जबाबावर मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांना सांगितलेला सर्व जबाब खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या मुलीला वाचविण्याकरीता आरोपीविरूध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

ARCHANA MANOJ GAIKWAD

Digitally signed by ARCHANA MANOJ GAIKWAD
Date: 2026.07.22 16:56:14 +0530

**(ए. एम.गायकवाड)**

**दिनांक - २२/०७/२०२६.** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग क्र.३, इचलकरंजी**